# कै. आप्पांच्या आठवणी, विचार आणि कार्य



२१/०९/२०१५

---

**भारतीय राष्ट्राचं प्रबोधन करायचं आहे !**

अध्यात्माचा पाया असलेल्या, ज्ञानविज्ञानाची उपासना भक्तियुक्त मनानं करणाऱ्या, कर्मकुशल कर्तुत्वाची कास धरणाऱ्या, समाजाच्या सर्व स्तरांमधून ध्येयवादी लोकसंघ निर्माण करू इच्छीणाऱ्या, स्वदेशात प्रबोधन घडवण्याची आकांक्षा धरणाऱ्या एका जयिष्णू संघटनेचं स्वप्न आप्पांनी रंगवलं. तेच ज्ञान प्रबोधिनीचं गन्तव्य आहे.

---